# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 03.10.2024** **वार – गुरुवार**

---

**शारदीय नवरात्रोत्सव**

आश्विन शुद्ध प्रतिपदेच्या मुहूर्तावर आजपासून राज्यात शारदीय नवरात्रोत्सवाला सुरुवात झाली. घरोघरी विधिवत घटस्थापना करण्यात आली. ठिकठिकाणच्या देवीच्या मंदिरांतही ब्राह्ममुहूर्तावर देवीची षोडशोपचार पूजा झाली. पुण्याची ग्रामदेवता तांबडी जोगेश्वरी मंदिर, चतुश्रृंगी देवी, पद्मावती देवी, काळी जोगेश्वरी, पिवळी जोगेश्वरी, संतोषीमाता मंदिर, वनदेवी मंदिर, महालक्ष्मी मंदिर तसंच देवीच्या अन्य विविध मंदिरांत आकर्षक रोषणाई, आणि फुलांची सजावट करण्यात आली आहे. आजच्या पहिल्या माळेपासूनच, या सर्व मंदिरांमध्ये दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली आहे. सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळांतर्फेही ढोलताशाच्या गजरात देवीची प्रतिष्ठापना करण्यात येत आहे.

**संयुक्त कोंकणी सभा**

जीएसबी संयुक्त कोंकणी सभा या संस्थेच्या पुणे शाखेतर्फे यंदा प्रथमच पुण्यात शारदोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. येत्या 8 ते 12 ऑक्टोबर या कालावधीत होणाऱ्या या महोत्सवात धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक तसंच आरोग्यविषयक उपक्रम राबवले जाणार आहेत. संस्थेचे अध्यक्ष अरुण किणी यांनी आज पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

**मराठवाडा रत्न पुरस्कार**

मराठवाडा सेवक प्रतिष्ठानतर्फे मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त राज्यस्तरीय 'मराठवाडा रत्न' पुरस्कार प्रदान केले जातात. या पुरस्कारांचं वितरण येत्या 8 तारखेला पुण्यात होणार आहे. डेक्कन अभिमत महाविद्यालयाचे माजी कुलसचिव गो. बं. देगलुरकर यांचा यावेळी जीवन गौरव पुरस्काराने सन्मान केला जाणार आहे.

**<u>अजितपवार</u>**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते 'आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना' नोंदणी उपक्रमाचा प्रारंभ आज बारामतीमध्ये करण्यात आला. या अंतर्गत या योजनेची तालुकाभरात जनजागृती केली जाईल तसंच पात्र लाभार्थ्यांची नोंदणीही करण्यात येणार आहे.

**<u>दहावीचेअर्ज</u>**

राज्य माध्यमिक आणि उच्च माधामिक शिक्षण मंडळाच्या वतीने येत्या फेब्रुवारी-मार्च महिन्यात घेतल्या जाणाऱ्या इयत्ता दहावीच्या परीक्षांचे अर्ज सोमवारपासून म्हणजे ७ ऑक्टोबरपासून भरता येणार आहेत. नियमित शुल्कासह येत्या ११ नोव्हेंबरपर्यंत अर्ज भरता येतील असं मंडळाच्या प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे.

<u>pcmc</u>

पर्यावरण जागृतीसाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने पिंपळे गुरव इथं आर आर आर म्हणजेच रिड्युस, रियुज, रिसायकल केंद्राची उभारणी करण्यात आली आहे. या केंद्रामध्ये नागरिकांनी ज्या निरूपयोगी वस्तू जमा केल्या आहेत, त्या वस्तू गरजूंना देण्यात येतील.

**<u>पुणेमनपा</u>**

पुण्यातील ज्या सार्वजनिक ठिकाणांवर वारंवार कचरा टाकला जातो अशा २८८ ठिकाणांची यादी घनकचरा विभागाने तयार केली आहे. हे प्रकार रोखण्यासाठी या ठिकाणचा कचरा पहाटेच उचलण्याचं नियोजन महापालिका प्रशासनाने केलं आहे. घनकचरा विभागाचे प्रमुख आणि पुणे महापालिकेचे उपायुक्त संदीप कदम यांनी आज पत्रकारांना ही माहिती दिली. केंद्र सरकारच्या वतीने स्वच्छ सर्वेक्षणांतर्गत शहराची पाहणी करण्यासाठी पथक येणार आहे. त्यासाठी प्रशासनाने तयारी सुरू केली आहे.

**<u>दिवाळीफराळ</u>**

परदेशात दिवाळीचा फराळ पोहचवण्यासाठी टपाल विभाग या वर्षी देखील सज्ज आहे. फराळाच्या पदार्थांचं नाममात्र किमतीमध्ये packaging करून माफक दरात परदेशात पाठवण्याची सोयही यंदा टपाल विभागानं  केली आहे. घरी येऊन फराळाचं पार्सल घेऊन जाण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सेवेचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असं आवाहन पुणे विभागाचे पोस्टमास्टर जनरल रामचंद्र जायभाये यांनी केलं आहे.

**<u>महावितरण ‘गो-ग्रीन’</u>**

महावितरणच्या ‘गो-ग्रीन’  योजनेचा लाभ घेत पश्चिम महाराष्ट्रातील एक लाख ९४ हजार ८९८ वीजग्राहकांनी छापील बील मागवणं बंद केलं आहे. ‘गो-ग्रीन’  योजनेत सहभागी झाल्याने या ग्राहकांना वार्षिक २ कोटी ३३ लाख ८७ हजार ७६० रुपयांचा फायदा होत आहे. सर्व लघुदाब ग्राहकांनी ‘गो-ग्रीन’ योजनेत सहभागी व्हावं असं आवाहन पुणे प्रादेशिक संचालक भुजंग खंदारे यांनी केलं आहे.

**<u>अत्याचार</u>**

पुण्यात वानवडीमध्ये एका शाळेच्या बस चालकाने शाळेतील दोन अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार केल्याचं उघड झालं आहे. मुलींनी या घटनेची माहिती पालकांना दिल्यावर या प्रकरणी वानवडी पोलिस

ठाण्यात चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संजय रेड्डी असं आरोपीचं नाव आहे. या प्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर कारवाई केली जाईल असं पोलीस उपायुक्त आर राजा यांनी सांगितलं.

**क्रीडा**

लडाखमध्ये येत्या पाच ते 10 ऑक्टोबर या कालावधीत राष्ट्रीय शालेय टेबल टेनिस स्पर्धा होत आहेत. यासाठी महाराष्ट्राचा संघ जाहीर झाला असून यामध्ये पुण्याच्या खेळाडूंनीही स्थान मिळवलं आहे. 14 वर्षांखालील गटात मुलींमध्ये आद्या गवते, नैशा रेवस्कर, श्रेया गायकवाड आणि नीरजा देशमुख; तर 19 वर्षांखालील गटात श्रेया शेलार, जानवी फणसे आणि मुलांमध्ये नील मुळे या पुण्याच्या खेळाडूंना संधी देण्यात आली आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान ३३ आणि किमान तापमान २३ पूर्णांक २ दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्याही साधारण असंच तापमान असेल, आणि आकाश अंशत: ढगाळ राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**